आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेत वक्फ (दुरुस्ती) विधेयक तसंच भारतीय वायुयान विधेयक सादर
- भारतीय रिझर्व बँकेचं द्वैमासिक पत धोरण जाहीर/ सर्व व्याजदर तसंच जीडीपी वाढीचा अंदाज कायम
- राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसन्मान यात्रेचा नाशिकमधून प्रारंभ
- रसायनशास्त्रातल्या शांती स्वरूप भटनागर पुरस्कारासाठी यवतमाळ जिल्ह्यातले डॉ.विवेक पोलशेट्टीवार यांची निवड

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकमधे कुस्तीगीर अमन सहरावतचा उपांत्य फेरीत प्रवेश / महिला कुस्तीगीर विनेश फोगटची निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

लोकसभेत आज वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी सादर केलं. यात वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करुन राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं या विधेयकाला विरोध केला असून सर्वपक्षीय बैठक बोलावून त्यावर सूचना घेण्याची मागणी केली आहे.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी आज लोकसभेत भारतीय वायुयान विधेयक २०२४ सादर केलं. हे विधेयक केंद्र सरकारला कोणत्याही विमानासाठी किंवा विमानांच्या श्रेणीसाठी, विमानाच्या ऑपरेशनच्या

सुरक्षिततेसाठी आणि कोणत्याही हवाई अपघाताच्या किंवा घटनेच्या तपासासाठी नियम बनविण्याचे अधिकार देतं.

**<><><><>**

कोविडनंतर सरकार भांडवली खर्चात जास्तीत जास्त वाढ करत असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. राज्यसभेत वित्त विधेयक, विनियोजन विधेयक आणि जम्मू आणि काश्मीर विनियोग विधेयकावरल्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. २०२३-२४ या आर्थिक प्रभावी भांडवली खर्च १५ लाख कोटीपेक्षा जास्त किंवा १८ टक्के असू शकतो, असं सीतारमन म्हणाल्या.

**<><><><>**

उद्यम पोर्टलवर ४ कोटी ८० लाख जणांनी नोंदणी केली आहे असं लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जीतन राम मांझी यांनी सांगितलं. उद्यम पोर्टल, पीएम विश्वकर्मा योजना आणि या क्षेत्रातील विविध उपक्रमांद्वारे २० कोटी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्याचही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

अणुऊर्जेमध्ये आत्मनिर्भर होण्यासाठी देशानं सातत्यानं प्रयत्न केल्याचं सरकारनं आज राज्यसभेत सांगितलं. भारतानं अणु आणि संबंधित इंधन तंत्रज्ञानात सर्वसमावेशक क्षमता प्राप्त केली असल्याचं राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात म्हटलं आहे. सध्याची अणुऊर्जा क्षमता ८ हजार १८० मेगावॅट वरुन २०३१-३२ पर्यंत २२ हजार ४८० मेगावॅट पर्यंत वाढणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

भारतीय रिझर्व बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना सलग नवव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं रेपो दर कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे स्थायी ठेवींवरचा व्याज दर सव्वा सहा टक्के, तसंच मुदत ठेवींवरचा व्याज दर आणि बँकांचा व्याज दर पावणेसात टक्क्यावर कायम राहील, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं की आर्थिक विकासाला चालना देताना चलनवाढ निर्धारित उद्दिष्टाशी सुसंगत राहील, यावर लक्ष केंद्रित करण्यावर पतधोरण समितीनं भर दिला आहे.

रिझर्व बँकेनं चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी, अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा अंदाजही ७ पूर्णांक २ दशांश टक्के इतका कायम ठेवला. जीडीपी मधली लवचिक आणि स्थिर वाढ पतधोरणाला चलनवाढीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्षम बनवते असं गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणाले.

कर्जपुरवठा क्षेत्रातल्या अवैध प्रकरणांना आळा घालण्यासाठी डिजिटल कर्ज पुरवठा करणाऱ्या ॲपची सुविधा उपलब्ध करण्याचा रिझर्व्ह बँकेचा विचार असल्याचं गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी घोषित केलं. रिझर्व बँकेनं UPI द्वारे कर भरण्याची मर्यादा देखील १ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये केली आहे.

<><><><><>

अल्प आणि मध्य उत्पन्न गटातल्या देशांना अनिवासी नागरिकांनी पाठवलेल्या पैशामुळे मोठा लाभ मिळत असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं जारी केलेल्या एका अहवालात म्हटलं आहे. २०२९ सालापर्यंत अनिवासी भारतीयांच्या

माध्यमातून भारतात येणारं परकीय चलन १६० अब्ज डॉलर्सवर पोहोचण्याचा अंदाज असल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता १७ ऑगस्टपर्यंत महिलांच्या खात्यात जमा होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. नाशिकमध्ये दिंडोरी इथं आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेचा प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरणं सुरू आहे. ही योजना राजकीय हेतूने प्रेरित नसून महिलांच्या सबलीकरणासाठी आणलेली आहे. येत्या १७ ऑगस्टपर्यंत महिलांच्या खात्यात या रकमेचा हप्ता जमा होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री पवार यांनी दिली.

हे जनतेचं सरकार असून या सरकारमुळेच मुलींना मोफत शिक्षण, शेतकऱ्यांच्या विजेच्या बिलाची माफी तसंच वर्षाला तीन सिलिंडर मोफत दिले जाणार आहेत. कांद्याच्या निर्यात धोरणामुळे शेतकरी अडचणीत येतात. त्यामुळे कांद्यावरच्या निर्यातीवरचे निर्बंध शिथिल करून ती सुलभ करावी यासाठी केंद्र शासनाला सांगितल्याचंही ते म्हणाले. नाशिक इथल्या नार-पार नदी जोड प्रकल्प तसंच किकवी धरणाला मंजुरी देणार असल्याचं अजित पवार यावेळी म्हणाले.

<><><><><>

बांगला देशातल्या राजकीय अस्थिरतेमुळं महाराष्ट्रातल्या व्यापाऱ्यांनी कांदा निर्यात तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. परिस्थिती स्थिर झाल्यानंतरच निर्यात पुन्हा सुरू होईल.

बांगलादेशात कांद्याचा सर्वात जास्त पुरवठा भारतातून होतो. महाराष्ट्रातल्या नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांतून सर्वाधिक कांदा निर्यात होतो. सध्या राजकीय अस्थिरतेमुळे ७० ट्रक सीमेवर अडकले होते. त्यातल्या काहींना परवानगी मिळाल्यानं ते बांगलादेशात पोहोचले आहेत. मात्र, परिस्थिती आटोक्यात आली नाही तर निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळं व्यापाऱ्यांनी सावध भूमिका घेत निर्यात बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

कणकवली, सिंधुदुर्ग आणि सावंतवाडी रेल्वे स्थानकांना जोडणाऱ्या रस्त्याचं कॉंक्रिटीकरण आणि सुशोभिकरण कामाचा लोकार्पण सोहळा सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते उद्या होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना नियुक्ती पत्रांचं वाटप करण्यात येणार आहे. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

<><><><>

जागतिक आदिवासी दिनानिमित्त नंदुरबार इथं तीन दिवसीय आदिवासी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवा अंतर्गत  नंदुरबार शहरातून आज भव्य रॅली काढण्यात आली.  यात राज्यभरातून आलेल्या आदिवासी कलापथकांनी विविध नृत्याविष्कार सादर केले. राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित हे तारपा वाद्य वाजवत या रॅलीत सहभागी झाले होते.

<><><><>

यवतमाळ जिल्ह्यातले मुकुटबनचे रहिवासी डॉ.विवेक पोलशेट्टीवार यांची राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांना रसायनशास्त्रातील शांती स्वरूप भटनागर हा पुरस्कार २३ ऑगस्ट रोजी दिल्लीमध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते देण्यात येणार आहे. सध्या ते टाटा इन्स्टिटय़ूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये कार्यरत आहेत.त्यांनी हवेतील कार्बनचे घटक वेगळे करून त्याचे उपयोगी घटकात रूपांतर करण्याबाबत संशोधन केलं आहे.

केंद्र सरकारनं काल राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या प्रतिष्ठेच्या पुरस्कारानं सन्मानित केलं जातं.

<><><><><>

२०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धा भारतात आयोजित करण्याबाबत भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं ऑलिंपिकचे भविष्यातले यजमान ठरवणाऱ्या समितीसोबत संवाद सुरू केला आहे. राज्यसभेत युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी लेखी उत्तरात ही माहिती दिली. देशात विविध क्रीडा स्पर्धांचं आयोजन करण्यासाठी क्रीडा पायाभूत सुविधा वाढवणे ही एक सतत प्रक्रिया असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये कुस्तीपटू अमन सहरावत याने ५७ किलो वजनी गटात उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. त्याने अल्बेनियाच्या झेलिमखान अबाकारोव्ह याचा १२-० असा पराभव केला. उपांत्य फेरीत सहरावतचा सामना जपानच्या रेई हिग्युची याच्याशी आज रात्री पावणे दहा वाजता होणार आहे.

पुरुष हॉकी संघाची कास्य पदकासाठी स्पेन बरोबर लढत सुरू असून भालाफेकपटू नीरज चोप्रा आज पदकासाठी मैदानात उतरणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार नीरज चोप्राचा सामना रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी सुरु होईल.

दरम्यान, भारताची वेटलिफ्टर मिराबाई चानु ४९ किलो वजनी गटात चौथ्या स्थानावर राहिली. धावपटू अविनाश साबळे याला पुरुषांच्या ३ हजार मीटर स्टिपलचेज प्रकारात अकराव्या स्थानावर तर महिलांच्या शंभर मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत ज्योती याराजी हिला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिनं आज आपल्या निवृत्तीची घोषणा केली. समाजमाध्यमावर पोस्ट करत आपण सर्व चाहते आणि देशवासियांचे कायम ऋणी राहू, असं विनेशनं म्हटलं आहे. दरम्यान, या निर्णयाविरोधात तिने क्रीडा लवाद न्यायालयात दाद मागितली असून आपल्याला रौप्य पदक द्यावं अशी मागणी केली आहे.

<><><><><>

समुद्रसपाटीवरचा कमी दाबाचा पट्टा दक्षिण गुजरात ते उत्तर केरळ किनारपट्टीच्या प्रदेशात कायम असून, त्याची तीव्रता कमी झाली आहे.

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता असून, कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.